<अंतिम सुधारीत अनुदान सन २०१७-२०१८
महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे वर्ग झालेल्या
शासकीय कर्मचा-यांना देय असलेल्या
निवृत्तीवेतनाची वर्गणी म्हणून प्राधिकरणास
सहायक अनुदान (२२१५ १६३८)
३१, सहायक अनुदाने (वेतनेतर)>

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्रमांकः बजेट-१४१७/प्र.क्र.२७३/पापु-२३

गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल, ७ वा मजला
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
तारीख: ३१ मार्च, २०१८

<u>वाचा :-</u>

१. **शासन निर्णय, पा.पु.व स्व.विभाग, क्रमांकः बजेट-१४१७/प्र.क्र.२७३/पापु-२३,दि.१३.१०.२०१७**
२. **शासन शुद्धीपत्रक, पा.पु.व स्व.विभाग, क्रमांकः बजेट-१४१७/प्र.क्र.२७३/पापु-२३,दि.७.२.२०१८**

<u>प्रस्तावना :-</u>

शासनाच्या आस्थापनेवर कार्यरत असलेले परिसर अभियांत्रिकी मंडळाचे सर्व कर्मचारी / अधिकारी सन १९७९ मध्ये महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळ स्थापन झाल्यानंतर शासनाकडून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे वर्ग करण्यात आले आहेत. सदर कर्मचा-यांच्या शासनाकडील सेवेच्या दायित्वासंबंधी निवृत्तीवेतन व निवृत्तीविषयक इतर लाभ अदा करण्यासाठी प्राधिकरणास २२१५ १६३८ या लेखाशिर्षाखाली शासनाकडून अनुदान देण्यात येते. सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी सदर प्रयोजनार्थ रुपये ३,५४,१८,०००/- (अक्षरी रुपये तीन कोटी चौपन्न लाख अठरा हजार फक्त) इतकी अर्थसंकल्पिय तरतूद करण्यात आली आहे. सदर तरतूद महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

शासन निर्णय :-

सन २०१७-१८ या आर्थिक वर्षामध्ये “मागणी क्रमांक वाय-२, २२१५, पाणीपुरवठा व स्वच्छता १९९, इतर शासकीय संस्थांना सहाय्य -- (०१) इतर शासकीय संस्थांना सहाय्य (०१)(०३) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे वर्ग झालेल्या शासकीय कर्मचा-यांना देय असलेल्या निवृत्तीवेतनाची

वर्गणी म्हणून प्राधिकरणास सहायक अनुदान (२२१५ १६३८) ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर)” या लेखाशिर्षाखाली रुपये ३,१८,७६,२००/- (अक्षरी रुपये तीन कोटी अठरा लाख शहात्तर हजार दोनशे फक्त) एवढी रोख रक्कम सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना वाचा मधील अनुक्रमांक १ च्या शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात आली होती. सदर वितरीत करण्यात आलेली तरतुद उपरोक्त लेखाशिर्षांतर्गत अंतिम सुधारीत अनुदान म्हणून मंजूर करण्यात येत आहे.

२. महालेखापाल, महाराष्ट्र १, मुंबई (लेखा व अनुज्ञेयता) यांनी उक्त रक्कम “मागणी क्रमांक वाय-२, २२१५, पाणीपुरवठा व स्वच्छता १९९, इतर अशासकीय संस्थांना सहाय्य -- (०१) इतर अशासकीय संस्थांना सहाय्य (०१)(०३) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे वर्ग झालेल्या शासकीय कर्मचा-यांना देय असलेल्या निवृत्तीवेतनाची वर्गणी म्हणून प्राधिकरणास सहायक अनुदान (२२१५१६३८) ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर)” या लेखाशिर्षाखाली खर्ची दाखवून, सन २०१७-२०१८ मधील वित्तीय लेख्यात समाविष्ट करावी.

३. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१७/प्र.क्र. ७५/अर्थ-३, दिनांक १८ एप्रिल,२०१७ अन्वये विभागांना दिलेल्या अधिकारात निर्गमित करण्यात येत आहेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०४१०११२१३६६७२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Balasaheb B Hajare

Digitally signed by Balasaheb B Hajare
DN: CN = Balasaheb B Hajare, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Water Supply and Sanitation Department
Date: 2018.04.10 12:24:29 +05'30'

बाळासाहेब बा. हजारे
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. विधानसभा / विधान परिषद सदस्य, सर्व
२. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
३. संचालक (वित्त), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, नवी मुंबई
४. महालेखापाल, महाराष्ट्र-१ मुंबई (लेखा व अनुज्ञेयता)

५. महालेखापाल, महाराष्ट्र-१ मुंबई (लेखा परिक्षा)
६. महालेखापाल, महाराष्ट्र-२ नागपूर (लेखा व अनुज्ञेयता)
७. महालेखापाल, महाराष्ट्र-२ नागपूर (लेखा परिक्षा)
८. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
९. अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखाधिकारी कार्यालय, वांद्रे, मुंबई
१०. कक्ष अधिकारी, वित्त विभाग, (व्यय-३ व अर्थ-१९)
११. कक्ष अधिकारी, नियोजन विभाग (कार्यासन-१४११)
१२. कार्यासन पापु-०४ व पापु-२०, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
१३. निवड नस्ती कार्यासन पापु-२३